# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रवेश सूचना

NAAC 'A' Grade

## एम.फिल. व पीएच.डी. प्रवेश 2018–19

शिवाजी विद्यापीठामार्फत एम.फिल व पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागणी करणेत येत आहेत. सदर प्रवेश प्रक्रिया **University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of M.PHIL./PH.D. Degrees) Regulations, 2016** नुसार राबविण्यात येणार आहे. सदर नियमावली, विद्यापीठाची प्रवेश क्षमता, परीक्षा केंद्र व माहितीपुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in मध्ये M.Phil./ Ph.D. Admission2018 या लिंकवर उपलब्ध आहेत.

ऑनलाईन अर्ज संबंधित विद्यार्थ्याने सर्व सूचनांचे काटेकोर पालन करून भरावा. भरलेल्या अर्जामध्ये काही तांत्रिक दुरूस्त्या असतील तर त्या mphilphd@unishivaji.ac.in या ईमेलवर दि. 19/07/2018 पूर्वी कळविण्याचे आहेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दुरूस्त्यांचा विचार केला जाणार नाही.

1. **ऑनलाईन अर्ज दि. 05/07/2018 दु. 12 पासून ते 19/07/2018 सायं. 06.00 वाजेपर्यंत.**
2. **प्रवेश परिक्षा दि. 08/08/2018, 09/08/2018, 10/08/2018. (प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच विद्यार्थ्यांना डाऊनलोडिंग करीता नंतर उपलब्ध करण्यात येईल.)**
3. **प्रवेश परीक्षा केंद्र**
   1. **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**
   2. **यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा.**
   3. **श्रीमती. मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली.**

**महत्वाच्या सूचना :–**

- **विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेबाबतच्या अटी व तरतुदी काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.**
- एम.फिल./पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया प्रवेश परीक्षेच्या निकषाद्वारे करण्यात येईल.
- प्रवेश परिक्षेतून सुट मिळणेबाबतचे निकष **RRD 2.5** व **RRD 2.6** नुसार राहतील. सदर नियमानुसार GATE / UGC JRF / SRF पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असणारा प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन अर्ज / नावनोंदणी ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.
- परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत सविस्तर माहिती एम.फिल. पीएच.डी. माहितीपुस्तिका 2018 मधील प्रपत्र मध्ये नमूद केली आहे.
- संवर्गनिहाय सामाजिक आरक्षण व अपंग आरक्षण महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार/तरतुदीनुसार लागू राहिल.
- विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर एम.फिल. व पिएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता असणा–या विषयांची यादी व अन्य सविस्तर माहिती उपलब्ध असणार आहे.
- ज्या विषयांसाठी प्रवेश क्षमता आहे अशाच विषयांकरीता विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा. प्रवेश क्षमता नसलेल्या विषयासाठी अर्ज व प्रवेश परीक्षा शुल्क भरल्यास त्यास विद्यापीठ कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा याबाबत तक्रारी/पत्र स्वीकारले जाणार नाहीत.
- संबंधीत विषयांच्या प्रवेश क्षमतेमध्ये बदल होऊ शकतो.
- एम.फिल./पीएच.डी. करीता विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी नियमानुसार व संबंधीत अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेच्या निकषानुसार करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांकरीता ऑनलाईन अर्ज web link http://online.unishivaji.ac.in वर उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेकरीता अर्ज ऑनलाईन माध्यमातून दि. 05/07/2018 रोजी दुपारी 12.00 पासून दि. 19/07/2018 रोजी सायंकाळी 6.00 वा. पर्यंत भरावयाचे आहेत.
- **विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जाची प्रत विद्यापीठात पाठवू नये.**
- एम.फील./पीएच.डी परीक्षेकरिता खुल्या संवर्गासाठी रु 850/–(Non Refundable) व राखीव संवर्गासाठी रु 600/– (Non Refundable) इतके शुल्क भरण्याकरिता पेमेट गेटवे सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शुल्क भरण्याबाबत Confirmation झाल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- प्रवेश परीक्षेसाठी एकदा भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.
- ज्या विषयाकरीता प्रवेश क्षमता जाहीर केली आहे. त्याच विषयाची प्रवेश परीक्षा आयोजित केली जाईल याची नोंद घ्यावी.
- प्रवेश पात्रतेच्या अटींच्या अधिन राहून ज्या विद्यार्थ्यांना एकापेक्षा अधिक विषयांच्या प्रवेश परीक्षेकरिता अर्ज करावयाचा आहे, अशा विषयांचे अर्ज स्वतंत्र भरावेत. तसेच प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र शुल्क भरावे.
- अपुरे शुल्काचे अर्ज / विनाशुल्क अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.
- एम.फिल., पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. तसेच परीक्षा विषयक इतर आवश्यक माहिती विद्यापीठाच्या उपरोक्त संकेतस्थळावर स्वतंत्रपणे वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. तेंव्हा सर्व संबंधितांनी सदर माहिती संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावी.
- **प्रत्येक विषयासाठी 100 गुणांची प्रवेश परीक्षा (Multiple Choice Based) ऑफलाईन (ओएमआर शीटव्दारे) घेतली जाईल. प्रवेश परीक्षेमध्ये पात्र होणेकरीता कमीत कमी 50 गुण प्राप्त करणे आवश्यक आहे व अंतिम गुणवत्ता यादी नुसार पात्र परीक्षार्थीना प्रवेश दिला जाईल. प्रवेश परीक्षेकरीता Negative Marking system असणार नाही.**
- **उत्तरपत्रिका ओ.एम.आर. शिट या प्रकारची असेल. त्याकरीता Black Ball Point Pen चा वापर करणे बंधनकारक आहे.**
- **प्रवेश परीक्षेकरीता Research Methodology वर आधारीत 50 गुणांची परीक्षा व पदव्युत्तर विषयास अनुसरून 50 गुणांची परीक्षा याप्रमाणे अभ्यासक्रम राहील. सदर अभ्यासक्रम वेबसाईट वर उपलब्ध आहे.**
- अर्ज भरताना तांत्रिक अडचणी आल्यास सदर अर्जाबाबत संगणक केंद्राच्या **0231–2609096** तसेच अन्य माहितीकरिता विद्यापीठाच्या पी.जी.बीयुटीआर विभागातील **0231–2609139** या क्रमांकावर संपर्क साधावा अथवा mphilphd@unishivaji.ac.in या मेलवर कळविण्यात यावे.

**स्थळ : कोल्हापूर**
**दिनाक. 05/07/2018** **कुलसचिव**